# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

स्थायी समितीची सभा **सोमवार दिनांक १६/०३/२०२० रोजी दुपारी ०२.३० वाजता** सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात खालील विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांक :- **११/०३/२०२०**

आदेशान्वये

हस्ता/-
(राजेश म. मोहिते)
निगम सचिव (प्र.)
तथा उपायुक्त
महानगरपालिका, नागपूर

**वि.क्र.०३ :-**
{**निवडणूक विभाग**}

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४४/का-५दि. १० फेब्रुवारी २०२० चे आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८८(ए) नुसार राज्य निवडणूक आयोग ठरविल त्या निवडणूकीशी संबधीत सर्व कल्पकउपाय योजना, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, अभ्यास दौरे, संशोधन व विश्लेषण नवीन प्रयोग तसेच तत्सम उपक्रम निवडणूकीशी संबधीत साहीत्य खरेदी, मतदान यंत्र खरेदी अथवा देखभाल दुरुस्ती अन्य तातडीच्या बाबी तसेच नवनवीन प्रकल्प राबविणे किंवा नवीन तंत्रज्ञानाची मदत घेण्याकरीता १ सप्टेंबर २०१९ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झाल्या आहेत अथवा होणार आहेत त्या सर्व नागरी स्थानिक संस्थांनी अंशदानाची रक्कम आयोगाचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत राज्य निवडणूक आयोगाच्या खात्यात जमा करावी असे आदेशात नमुद आहे.

नागपूर महानगरपालिकेला रु.२.५०/- प्रति मतदार याप्रमाणे नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ मधील सरासरी मतदार संख्या २०,९३,३९२ विचारात घेवून रु. ५२,३३,४८०/- (रु.बावण लक्ष तेहत्तीस हजार चारशे एंशी) लेखाधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई (Account Officer, State Election Commission, Mumbai) यांचे चालु खाते (Current Account) State Bank of India, Madam Cama Road, Nariman Point – 21, IFSC Code No. SBIN0008586, Current Account No. 10768099138मध्ये पद क्र. १६ ‘निवडणूक खर्च’या पदामधून जमा करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

———————————